महाराष्ट्रातील आदिवासी शेतकऱ्यांचा आर्थिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास - विशेष संदर्भ नाशिक जिल्हा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड च्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखांतर्गत वाणिज्य विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर करावयाच्या

संशोधन प्रबंधाचा आराखडा

संशोधक

खंडेराव बाळासाहेब महाले

मार्गदर्शक

डॉ. मारोती धोंडीबा कछवे

प्रोफेसर व वाणिज्य विभाग प्रमुख
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ,
जि. परभणी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

जुलै, २०२२

प्रस्तावना

जगातील कोणत्याही राष्ट्राची आर्थिक प्रगती ही त्या देशाच्या कृषीक्षेत्रावर झालेली दिसून येते. आज जगात प्रगत समजल्या जाणाऱ्या राष्ट्रांचा विकास हा त्या देशातील कृषी व्यवसाय सुधारल्यानंतर इतर क्षेत्रात देखिल उल्लेखनीय प्रगती झालेली दिसून येते. कृषी व्यवसायाची वाढ करत असतांना शेतीचा आकार व उत्पादकता याकडे लक्ष द्यावे लागते.

प्रत्येक देशाच्या कृषी विकासासाठी त्या शेतकऱ्यांची धारणक्षमता किती आहे किंवा कोणत्या प्रकारची आहे यावर शेतीचा विकास अवलंबून असतो. ज्या देशात शेती व्यवसायासाठी असणारी जमिनीची उपलब्धता कमी आहे किंवा अल्पभूधारक शेतकऱ्यांचे प्रमाण जास्त असेल तर त्यांची आर्थिक स्थिती नाजूक असते व शेती व्यवसायासमोर विविध समस्या निर्माण होतात.

ज्या राष्ट्रात लोकसंख्या अधिक आहे. त्या राष्ट्रात कृषी व्यवसायावर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण अधिक असते. शेती व्यवसायाशी बांधिलकी जपणाऱ्या देशात आर्थिक परिस्थिती बिकट असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण अधिक दिसून येते. त्यामुळे शेती व्यवसायात आवश्यक असलेले तंत्रज्ञान, बी-बियाणे, अवजारे, किटकनाशके व जलसिंचनाच्या सुविधा इत्यादींचा वापर करता येत नाही. याचा विपरित परिणाम शेती व्यवसायावर होतो. प्रगत समजल्या जाणाऱ्या राष्ट्रात देखिल शेती व्यवसाय प्रारंभिच्या काळात जेमतेमच होता. शेती व्यवसायाच्या प्रगतीवर इतर क्षेत्रात देखील त्यांनी प्रगती साधली आहे. त्या राष्ट्रातील शेती व्यवसायावर अवलंबित्वाचे प्रमाण कमी झाले. त्यामुळे धारण क्षेत्राचा आकार देखील वाढला. शेती व्यवसायात अमुलाग्र त्या सुधारणा करणे शक्य झाले.

भारत देश पारंपरिक कृषी प्रधान देश म्हणून ओळखला जात आहे. सेवा क्षेत्र आणि औद्योगिक क्षेत्राची कितीही भरभराट झाली तरी आजही भारतातील सन १९४७ च्या आकडेवारीनूसार ७० टक्के लोक शेतीवर आणि शेतीवर आधारीत व्यवसायांवर जीवन जगत आहेत. भारतात आजही एकूण लोकसंख्येपैकी सन १९४७ च्या आकडेवारीनुसार

६८ टक्के लोक खेड्यात राहतात व त्यांचा प्रमुख व्यवसाय शेती हाच आहे. प्राचीन काळापासून खेडी स्वयंपूर्ण होती. खेड्यातील लघु व कुटीर उद्योग हे शेती क्षेत्रात उत्पादीत होणाऱ्या कच्च्या मालावर चालत होते. राष्ट्रीय उत्पन्नात सन १९४७ मध्ये क्षेत्राचा वाटा जवळजवळ ४३ टक्के होता तो सन २०१५-१६ मध्ये ३५ टक्के पर्यंत आला असून शेती क्षेत्राचा समावेश प्राथमिक क्षेत्रात करण्यात येतो.

महात्मा गांधीजींनी “भारतातील शेती ही भारतीय लोकांच्या उपजिविकेचे प्रमुख साधन असल्यामुळे शेती हा भारताचा आत्मा आहे.” असे म्हटले होते ते आजही खरे आहे. नैसर्गिक साधन सामग्रीचा विचार केला असता भूमी, जलसंपत्ती, मत्स्योत्पादने, खनिज संपत्ती, वनसंपत्ती, पर्जन्यमान, हवामान इत्यादी सारखी विपूल प्रमाणात साधनसामग्री देखील विपूल आहे. मात्र भांडवलाच्या तुटवड्यामुळे या दोन्ही साधन सामग्रीचा भारताला पर्याप्त वापर करून घेता येत नाही. म्हणून असे म्हटले जाते की, “भारत हा नैसर्गिक व मानवी साधनसामग्रीच्या बाबतीत श्रीमंत असलेला एक दरिद्री देश आहे.”

भारतातील बहूसंख्य जनता ही शेती व्यवसायावर आपली उपजिविका भागविते. सन १९५०-५१ मध्ये ७० टक्के तर २००९-१० मध्ये ५२ टक्के एवढी लोकसंख्या शेतीवर अवलंबून असलेली दिसते. जरी कृषी व्यवसायातील हे अवलंबित्वाचे प्रमाण कमी होत असले तरी द्वितीय व तृतिय क्षेत्रापेक्षा उपजिवीकेचे साधन म्हणून कृषी व्यवसायाकडे पाहिले जाते.

शेतीचा आकार आणि उत्पादकता ह्यात परस्पर संबंध आहे. भारतात उपलब्ध असलेली शेतजमिन व लोकसंख्या हे दोन घटक जुळत नाहीत. जमिनीचा पुरवठा स्थिर असतो. लोकसंख्या मात्र वाढत जाते. परिणामतः जमिनीची मागणी वाढून धारणक्षेत्राचा आकार लहान होत जातो. अशा जमिनीच्या लहान तुकड्यावर आधुनिक पद्धतीने शेतीकरणे परवडत नाही. कारण नवीन उत्पादन तंत्र, संकरित बी-बियाणे, रासायनिक खते, किटकनाशके, जलसिंचनाच्या सुविधा यांचा वापर योग्य प्रमाणावर करणे शक्य होत नाही.

त्यामुळे शेतीच्या उत्पादकतेवर व त्या शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीवर प्रतिकूल परिणाम पडतो.

शेती व्यवसायातील सामाजिक व आर्थिक बाजु पाहतांना आदिवासी शेतकऱ्यांचा अभ्यास करणे महत्वाचे ठरते. आदिवासी शेतकऱ्यांची सामाजिक व आर्थिक स्थिती सुधारायची असेल तर काही मुलभूत सुधारणा करणे आवश्यक आहे. शेती व्यवसायावरील अवलंबित्व असणाऱ्या लोकांचे प्रमाण कमी केले पाहिजे. आदिवासी शेतकऱ्यांना सामुहिक शेतीचा प्रयोग अंमलात आणला पाहिजे. द्वितीय व तृतिय क्षेत्राचा विकास करून शेती व्यवसायातील अतिरिक्त मनुष्यबळ या दोन क्षेत्रासाठी वापरले पाहिजे.

यावरून असे लक्षात येते की, आदिवासी शेतकऱ्यांची सामाजिक व आर्थिक स्थिती मजबुत करायची असेल तर आदिवासी शेतकऱ्यांना आवश्यक असलेल्या सोयी-सुविधा पुरविल्या पाहिजे. कृषी क्षेत्राचा जास्तीतजास्त विकास करून इतर उद्योग व्यवसायात जास्त लोकसंख्या सामावून घेतली पाहिजे.

तात्त्विकदृष्ट्या विचार करता आदिवासी शेतकऱ्यांमध्ये असंतोष का निर्माण होतो, ते आत्महत्त्या का करतात, स्वतःची शेती असून देखील इतर ठिकाणी स्थलांतरित होऊन मजुरी का करतात हे समजण्यासाठी त्याची सामाजिक, आर्थिक, मानसिक व कौटुंबिक पार्श्वभूमी समजून घेणे आवश्यक ठरते. आदिवासी शेतकरी दुर्गम अश्या पाड्यांवर तसेच खेड्यात राहून शेती करतात. त्यामुळे आपल्या अविकसित शेतीबद्दल एक प्रकारची अप्रियतेची जाणीव निर्माण होते. सदन शेतकरी व आदिवासी शेतकरी यांच्यातील सामाजिक व आर्थिक दरी दिवसेदिवस कमी होण्याऐवजी ती वाढत चालेली दिसून येत आहे. अश्या या आदिवासी शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक समस्येंचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने महाराष्ट्रातील आदिवासी शेतकऱ्यांचा आर्थिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास - विशेष संदर्भ नाशिक जिल्हा सदरचा विषय केंद्रित केलेला आहे.

संशोधन समस्या

महाराष्ट्रातील आदिवासी शेतकऱ्यांचा आर्थिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास - विशेष संदर्भ नाशिक जिल्हा

संशोधन विषयाची निवड

महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यात पंधरा तालुके असून त्यापैकी बहुतांश तालुक्यांमध्ये प्रामुख्याने आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण जास्त आहे. या आदिवासींचा मुख्य व्यवसाय म्हणजे मागासलेली शेती होय. नाशिक जिल्हा प्रामुख्याने गुजरातच्या सीमेलगत असल्यामुळे महाराष्ट्र आणि गुजरात यांच्या सीमेरेषेमधील जंगल मोठया प्रमाणावर असल्यामुळे या जंगल संपत्तीवर काही लोक वेगवेगळे व्यवसाय करताना दिसून येतात. हा समाज आजही मोठया प्रमाणात अंधश्रध्दा, रूढी, परंपरा, अज्ञानी, अडाणी आहे.

नाशिक जिल्हयातील बहुसंख्य आदिवासी लोकांजवळ शेती आहे. परंतु आधुनिक काळात ज्या प्रमाणात बदल होत आहे, वेगवेगळया क्षेत्रांचा विकास होत आहे. त्या प्रमाणात या आदिवासी लोकामध्ये शेती कसण्याच्या पध्दतीमध्ये बदल झालेला नाही. काही मोजक्याच शेतकऱ्यामध्ये शेती कसण्याच्या पध्दतीत बदल झालेला आहे. ज्यांच्याजवळ मोठया प्रमाणात भांडवल आहे. जो शेतकरी शिक्षित आहे, ज्याला आदिवासी योजनांची माहिती आहे, जो राजकारणात सक्रीय आहे त्याच शेतकऱ्याचा विकास झालेला आहे. जो शेतकरी अज्ञान आहे, ज्याला आदिवासी योजनांची माहिती नाही, जो राजकारणात सक्रीय नाही अशा शेतकऱ्यांचे प्रमाण आज नाशिक जिल्हयात बहुसंख्य आहे. म्हणून या आदिवासी शेतकऱ्यांचे शेती कसण्याच्या मागासलेपणामुळे त्यांची आर्थिक, सामाजिक परिस्थिती अंत्यत दयनीय आहे. कारण त्यांची शेती मागासलेली असल्यामुळे त्या शेतीमधून त्यांना मिळणारे उत्पन्न कमी आहे. बहुसंख्य आदिवासी शेतकऱ्यांची शेती ही निसर्गावर अवलंबून असल्यामुळे कधी उत्पन्न मिळते तर कधी उत्पन्न मिळत नाही अशी त्यांची शेती असल्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती कमकुवत आहे.

आदिवासी शेतकऱ्यांच्या सामाजिक जीवनाकडे एक दृष्टिक्षेप टाकल्यास त्यांचे सामाजिक जीवन आर्थिक, कौटुंबिक जीवनाशी निगडीत आहे. हे लोक अंधश्रध्देला चिकटून बसलेले दिसून येतात. या लोकांचे संपूर्ण सामाजिक जीवन हे त्यांच्या चालीरितीनुसारच असते. त्या चालीरिती, परंपरांच्या विरूध्द वर्तन करायला त्यांना आवडत नाही. उदा. पुजा, विधी, सण इत्यादीच्या वेळी मद्यप्राशन (दारू) करणे तसेच पुरूष, महिला व बालके या सर्वांनी ते मद्यप्राशन करणे, त्याचबरोबर होळी, दिवाळी, वाघदेव, इंदलदेव, भोंगऱ्यादेव, पोळा, कानुबाई, शेटपुजा, चक्रपुजा, भालदेव, वटपौर्णिमा, अक्षयतृतीया इत्यादी सण ग्रामीण भागात मोठ्या उत्साहाने साजरे करतात.

नाशिक जिल्हयातील आदिवासी शेतकऱ्यांची आर्थिक व सामाजिक स्थिती बघितल्यास त्याचे जीवन अत्यंत दयनीय आहे. भारताला स्वांतत्र्य मिळून अर्धशतक पूर्ण झाले. अनुसूचित जाती जमातीसाठी मोठया प्रमाणावर शासनाने कल्याणकारी योजना राबविल्या व सध्याही राबविल्या जात आहेत. तरी या समाजाचा आर्थिक व सामाजिक विकास का होत नाही या दृष्टीने संशोधकाने प्रत्यक्ष या समाजातील जीवन स्वतः बघितल्यामुळे संशोधकाने आदिवासी समाजातील शेतकऱ्यांची आर्थिक अहवालाद्वारे आदिवासी शेतकऱ्यांची आर्थिक व सामाजिक वास्तव स्थिती काय आहे? व या आदिवासीच्या विकासासाठी कोणत्या उपाययोजना करता येईल याचा अभ्यास प्रस्तुत संशोधनाद्वारे करण्याचा प्रयत्न केला आहे.

संशोधन क्षेत्र व कालावधी

आदिवासी शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक अभ्यासासाठी संशोधकाने नाशिक जिल्ह्याची निवड केलेली असून, नाशिक जिल्ह्यात पंधरा तालुके आहे. पंधरा तालुक्यांतील ज्या गावांमध्ये आदिवासी लोकसंख्या जास्त संख्या आहे अश्या गावांची निवड केलेली आहे.

उपरोक्त आदिवासी शेतकऱ्यांचा आर्थिक अभ्यास करण्यासाठी संशोधकाने विशेषतः २०११ ते २०२१ या कालावधीचा विचार केलेला आहे.

आकृती क्र. १ : अभ्यास क्षेत्राचा नकाशा



संशोधनाची उद्दिष्टे

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे पुढील प्रकारे निश्चित केली आहेत.

१. आदिवासी शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.

२. आदिवासी शेतकऱ्यांच्या शेती कसण्याच्या पद्धती व पीक रचनेचा अभ्यास करणे.

३. आदिवासी शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचा व खर्चाचा तौलनिक अभ्यास करणे.

४. आदिवासी शेतकऱ्यांसाठी शासनामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांचा चिकित्सक अभ्यास करणे.

५. आदिवासी शेतकऱ्यांचा व त्यांच्या कुटुंबाचा शैक्षणिक, मानसिक व आरोग्य विषयक बाबींचा अभ्यास करणे.

६. आदिवासी शेतकऱ्यांच्या समस्यांचा आढावा घेणे आणि त्यांच्या जीवनात सामाजिक व आर्थिक सुधारणा घडून येण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

संशोधनाच्या उद्दिष्टांची पडताळणी

नाशिक जिल्ह्यातील आदिवासी शेतकऱ्यांचा अभ्यास करत असताना निवडलेल्या गावांतील आदिवासी शेतकरी, कृषी अधिकारी व गावातील सरपंच यांच्याशी प्रत्यक्ष भेटून व प्रश्नावलीवरून तसेच आदिवासी शेतकऱ्यांना प्रोत्साहन व उत्तेजन देण्यासाठी शासनाने पुरविलेल्या सुविधा व आदिवासी शेतकऱ्यांचा अनुभव याद्वारे उद्दिष्टांची पडताळणी केली जाईल.

संशोधनाची गृहीतके

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील गृहीत कृत्ये प्रमाण मानली आहेत.

१. आदिवासी शेतकऱ्यांची शेती कसण्याची पद्धती आणि उत्पन्न यात सहसंबंध आहे.

२. वर्षानुवर्षे शेती व्यवसाय करूनही त्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीत फारशी सुधारणा झालेली दिसून येत नाही.

३. आदिवासी शेतकऱ्यांचे उत्पन्नाचे मार्ग व राहणीमान यात सहसंबंध आहे.

संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने नाशिक जिल्ह्यातील आदिवासी शेतकऱ्यांचा आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी **यादृच्छिक सर्वेक्षण पद्धतीचा** (Random Sampling Survey Method) वापर केला जाईल.

संशोधनाची नमुना निवड पद्धत

सदर संशोधनासाठी **यादृच्छिक सर्वेक्षण पद्धतीचा** (Random Sampling Survey Method) वापर करण्यात येईल. सन २०११ च्या जनगणना अहवालानुसार नाशिक जिल्ह्यातील १५ तालुक्यांमधून आदिवासी लोकसंख्येचे जास्त प्रमाण असणाऱ्या ७ तालुक्यांची निवड करून प्रत्येक तालुक्यातून १०० टक्के आदिवासी लोकसंख्या असणाऱ्या ३ गावांची निवड करण्यात येईल. तालुकानिहाय प्रत्येकी ३ गावांची निवड केल्याने एकूण

२१ गावांचा अभ्यास केला जाईल. प्रत्येक गावातून १० आदिवासी शेतकरी या प्रमाणे २१० नमुना निवड करण्यात येईल.

माहिती संकलनाचे स्त्रोत

प्रस्तुत संशोधनात माहिती व आकडेवारी मिळवण्यासाठी प्राथमिक व दुय्यम सामग्री या दोन्ही पद्धतींचा वापर करण्यात येईल.

प्राथमिक सामग्रीच्या (**प्रश्नावली व मुलाखत**) साह्याने आदिवासी शेतकरी, शेतकऱ्यांचे कुटुंबे, त्यांचे उत्पादन, शेती करण्याची पद्धत व शासनाकडून मिळणाऱ्या सुविधा इ. बाबतची माहिती संकलित केली जाईल. प्रश्नावली तयार करून आदिवासी शेतकऱ्यांना व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना भेटून त्यांची मुलाखत घेवून सदरची माहिती संकलित केली जाईल.

प्रस्तुत संशोधनासाठी लागणारी दुय्यम माहिती शोध प्रबंध, शोधनिबंध, आदिवासी आयुक्तालयाचे अहवाल, वार्षिक अहवाल, केंद्र व राज्य शासनाची विविध प्रकाशने, शासनाची वेगवेगळी परिपत्रके, विविध संशोधन पत्रिका, ग्रंथ, साप्ताहीके, इंटरनेट, वर्तमान पत्र यातून संकलित केली जाईल.

माहिती विश्लेषण तंत्र

प्रस्तुत संशोधनात माहिती व आकडेवारी यांचे विश्लेषण करण्यासाठी सरासरी / शेकडेवारी, सहसंबंध, काय स्क्वेअर मूल्य, विचलन, आलेख व एस.पी.एस.एस. सॉफ्टवेअर या संख्याशाश्रीय तंत्रांचा वापर करण्यात येईल. तसेच आदिवासी शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक विश्लेषणासाठी मानव विकास निर्देशांक, आर्थिक विकास निर्देशांक, संमिस्त्र निर्देशांक (Composite Index) व समाधान मात्रा यांचा वापर करण्यात येईल.

संशोधनाची व्याप्ती

प्रस्तुत संशोधनात नाशिक जिल्ह्यातील आदिवासी शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा आढावा घेतला जाईल. शासनामार्फत आदिवासी शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या सेवा-सुविधांचा यात अभ्यास केला जाईल. तसेच आदिवासी शेतकऱ्यांचे उत्पादन व त्यांचा खर्च यांचा तुलनात्मक अभ्यास करून आदिवासी शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक घटकावर सदरच्या संशोधनातून प्रकाश टाकण्याचा प्रयत्न संशोधक करेल.

संशोधनाचे महत्व

१. नाशिक जिल्हयातील एकूण आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण २५.६२ टक्के आहे. या जिल्हयातील बहुसंख्य आदिवासी लोकसंख्या शेती कसते व ही शेती आजही मोठ्या प्रमाणात परंपरागत पध्दतीने कसत असल्यामुळे आजच्या विज्ञान युगात आदिवासी शेतकरी मागे राहू नये यासाठी आधुनिक पध्दतीने शेती केल्यास त्यांच्या उत्पादन क्षमतेत वाढ होण्यास मदत होईल त्या दृष्टीने हे संशोधन महत्त्वाचे आहे.

२. आदिवासी शेतकऱ्यांची शेती मागासलेली असल्यामुळे त्याचे उत्पन्न कमी असल्याने त्यांची बचत क्षमता देखील कमी असते. परिणामी त्यांची शेतीतील गुंतवणूक कमी होते. आदिवासी शेतकऱ्यांची उत्पन्न व बचत क्षमता वाढवायची असेल तर आदिवासी विकास योजनांचा लाभ घेणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने हे संशोधन महत्त्वाचे आहे.

३. आदिवासी शेतकऱ्यांमध्ये दारिद्रयांचे प्रमाण जास्त आहे. तसेच शिक्षणाचा अभाव असल्यामुळे अंधश्रध्देचे प्रमाण जास्त आहे. या संशोधनाच्या माध्यमातून आदिवासी शेतकऱ्यांमध्ये असणारी अंधश्रध्दा, व्यासनाधिनतेचे मोठे प्रमाण, अनिष्ठ रूढी, परंपरा, प्रथा कमी होण्यास व शिक्षणाचा प्रसार वाढल्यास त्यांच्यात जागृती होवून त्यांच्या राहणीमानात सुधारणा होईल या दृष्टीने हे संशोधन महत्त्वाचे आहे.

४. आदिवासी समाज अज्ञानी, अडाणी, देवभोळा असून रूढी, परंपरा, चालिरिती इ. बंधनात अडकलेला आहे. त्यांचा अभ्यास करून व या समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होण्यासाठी हे संशोधन महत्त्वाचे आहे.

५. आदिवासी शेतकऱ्यांसाठी शासनाने अनेक योजना राबविल्या आहेत. त्यातील बोटावर मोजण्याइतक्याच शेतकऱ्यांना या योजनांचा लाभ होतो. म्हणून जे शेतकरी अत्यंत गरीब आहे. मागासलेले आहे त्यांना शासन राबवित असलेल्या योजनांचा लाभ होणे अत्यंत गरजेचे आहे. त्यादृष्टिनेही हे संशोधन महत्त्वाचे आहे.

संशोधनाच्या मर्यादा

१. प्रस्तुत संशोधन नाशिक जिल्हयातील १५ तालुक्यातील निवडलेल्या ७ तालुक्यांपुरताच मर्यादित असेल.

२. संशोधकाने गोळा केलेली माहिती प्रत्यक्ष व दुय्यम संकलन पध्दतीवर आधारलेली असल्यामुळे ती १०० टक्के खरी असेलच असे नाही.

३. आदिवासी शेतकऱ्यांच्या विकासासाठी असलेली शासकीय योजनांची माहिती पूर्ण मिळेलच असे नाही.

४. संशोधकाने अभ्यासाचा कालावधी २०११ ते २०२१ या कालावधीपुरता मर्यादित आहे.

प्रकरणानुसार शोध प्रबंधाची मांडणी

सदर संशोधनाची विभागणी ७ प्रकरणांमध्ये केलेली आहे.

प्रकरण १: प्रास्ताविक

प्रकरण २: संदर्भ साहित्याचा आढावा

प्रकरण ३: नाशिक जिल्ह्याची पार्श्वभूमी

प्रकरण ४: आदिवासी शेतकऱ्यांचा आर्थिक व शेती व्यवसायाबाबत आढावा

प्रकरण ५: आदिवासी योजनांचा अभ्यास

प्रकरण ६: आदिवासी शेतकऱ्यांचे सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक विश्लेषण

प्रकरण ७: सारांश, निष्कर्ष व शिफारशी

संदर्भ साहित्याचा आढावा

सदर प्रकरणात आदिवासी शेतकऱ्यांच्या विविध पैलूवर ज्या संशोधकानी किंवा अभ्यासकानी संशोधन केले आहे. त्या संशोधनाचा आढावा घेण्याचा प्रयत्न संशोधकानी केला आहे. आदिवासीच्या जीवनावर त्यांच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक चालिरीती अशा विविध पैलूवर विविध संशोधकांनी या पूर्वी प्रकाश टाकलेला आहे.

गोविंद गारे यांनी "Tribals in at Urban setting" या विषयावर १९७२ साली पुणे विद्यापिठात Ph.D प्रबंध सादर केला त्यातील महादेव कोळी समाजाच्या धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीचा अभ्यास केला. त्यात त्यांनी काही महत्त्वाच्या उद्दिष्ठाचा अभ्यास केला ती पुढीलप्रमाणे.

महादेव कोळी समाजाचे मुळस्थान आणि त्यांच्या स्थलांतरणाबाबतचा इतिहास अभ्यासणे, या समाजाची लोकसंख्या, कुटुंबव्यवस्था, जीवन पध्दती, राहणीमान, जीवनमानाच्या पध्दती, सांस्कृतिक घटक, जाती व्यवस्था इ. चा अभ्यास करणे, शेतजमीन उत्पन्न व खर्च पध्दती, कर्जबाजारीपणा इ. चा अभ्यास करणे, या समाजातील विवाह पध्दती, विवाहाचे वय, घटस्फोट, विधवा पुनर्विवाह, महिलांचे स्थान इ. चा अभ्यास करणे, या समाजाच्या सद्यस्थितीच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक परिस्थितीचा अभ्यास करणे, या समाजातील घराची स्थिती, स्त्री पुरुषांची वेशभूषा, कुटुंबाचे आकारमान, जीवन जगण्याच्या पध्दती, शहरी भागातील वास्तव व व्यवसाय इ. बाबींचा अभ्यास करणे, महादेव कोळी समाजातील विवाह कायदा, सण, उत्सव यांचा अभ्यास करणे.

समल जगबंधु यांनी “Some Aspects of the trible Economy a case study of koraput District of - 1972” या विषयांवर Ph.D. प्रबंध पुणे विद्यापीठात सादर केला. त्यांच्या अभ्यासाची उद्दिष्टे पुढील प्रमाणे.

आदिवासी अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये भौगोलिकदृष्टया आदिवासीच्या वास्तव्यानुसार पडलेले प्रादेशिक विभाग, मध्यवर्ती आदिवासी पट्टा, सहयाद्री पट्टा, विंध्य पर्वत रांगा, कोकण पट्टा, आदिवासी पट्टयातील दुष्काळग्रस्त विभाग इ. चा अभ्यास करणे, आदिवासी अर्थव्यवस्था, कोरापुर जिल्हयातील आर्थिक स्तर, तेथील गावे, जंगले, पर्जन्यामान व हवामान इ. ची मध्यवर्ती आदिवासी पट्टयांशी तुलना करणे, आदिवासी लोकसंख्या, साक्षरता, आरोग्य, कर्ती लोकसंख्या आर्थिक हालचाल (स्तर), उलाढाल, शेती, जमिन मशागत, शेतीकाम, शेतमजूर, रोजगार, श्रमाची उत्पादक पातळी इ. घटकाचा अभ्यास करणे.

पी. आर. त्रिकोणे यांनी सप्टेंबर २००१ मध्ये “ठाकर जमातीची सामाजिक व आर्थिक स्थिती एक आढावा" या विषयावर संशोधन केले या पाहणी अहवालात ठाणे, रायगड, पुणे, नाशिक व अहमदनगर जिल्ह्यातील ठाकर जमातीबाबत संशोधन केले आहे. या पाहणीत ठाकर जमातीची लोकसंख्या त्यांचे वास्तव्य, साक्षरता दर, शैक्षणिक पातळी, निवासाची स्थिती, भुधारक कुटुंब, अल्पभुधारक कुटुंबे, भुमिहीन कुटुंबे, मुख्य व्यवसायापासून मिळणारे उत्पन्न शासकीय विकास योजनांचा लाभ, त्यांचे आरोग्य व राहणीमान इ. बाबींवर संशोधन केलेले आहे.

रसेल हिरालाल यांनी १९९६ मध्ये प्रकाशित केलेल्या "द ट्राईब्ज एन्ड द कास्टस् ऑफ द सेन्ट्रल प्रोव्हिन्सेस ऑफ इंडिया" या ग्रंथात महाराष्ट्रातील गोंड, भिल्ल, कोरकु, पारधी, पारधान इ. जातीच्या उत्पत्तीविषयी सविस्तर विवेचन केले आहे.' त्यात त्यांनी महाराष्ट्रातील आदिवासी जमाती या विविध विभागात विखुरलेल्या आहेत. यात गोंड, भिल्ल, कोरकु या आदिवासी प्रमुख जमाती आहेत. प्रत्येक आदिवासी जमातीची संस्कृती, राहणीमान, व्यवसाय हे एकमेकांशी मिळते जुळते आहेत.

सेतु माधवराव पगडींनी १९४९ मध्ये प्रकाशित केलेल्या "Among the Gonds of Adilabad" या पुस्तकात पारधान, कोलाम, गोंड या आदिवासींच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक जीवनावर प्रकाश टाकून विविध बाबींचा शोध घेतला आहे.

कुसुम नारगोळकर व वसंत नारगोळकर यांनी १९५५ साली “जंगलाचे राजे” या ग्रंथात त्यांनी वारली या जमातीविषयी विस्तृत विवेचन केले आहे.

के. जे. सावे यांनी १९४५ मध्ये प्रकाशित केलेल्या "द वारलीज" या पुस्तकात वारल्यांच्या सांस्कृतिक जीवनावरील पैलुंचा अभ्यास केला आहे.

भाऊ मांडवकर यांनी १९६६ मध्ये प्रकाशित केलेल्या "कोलाम" या संशोधन ग्रंथात कोलामांच्या जीवनावरील विविध बाबींवर विस्तृत प्रकाश टाकला आहे.

एस. जी. देवगांवकर यांचे १९८२ मधील प्रकाशित झालेल्या "द माडिया ऑफ भामरागड" या ग्रंथात मागास व दुर्गम प्रदेशातील माडिया गोड या वन्य जमातीच्या नैसर्गिक जीवनावर प्रकाश टाकला आहे.

एस. जी. देवगांवकर यांचे २००१ मधील प्रकाशित "आदिवासी विश्व" व २००१ मधीलच “आदिवासीच्या धर्मकल्पना आणि देवदेवता" या संदर्भ ग्रंथात त्यांनी आदिवासींचा अंधश्रध्देवर व रूढी परंपरावर असलेला प्रचंड विश्वास इ. चे वर्णन केले आहे.

सुधीर जयराम बिरजे यांनी २०१३ मध्ये प्रकाशित केलेल्या "शेती बिनशेती जमीन" या पुस्तकात शेतकरी व शेतमजूर यांच्यासाठी असलेल्या योजनांचे वर्णने केलेले आहे.

भाऊ मांडवकर यांनी १९८१ मध्ये प्रकाशित केलेल्या “आदिम" या ग्रंथात कोरकु आदिवासींच्या जीवनावर प्रकाश टाकणारा ग्रंथ प्रकाशित केला.

सी हेमनडार्फ यांनी १९७९ मध्ये प्रकाशित केलेल्या "द गोंडस ऑफ आंध्रप्रदेश" या ग्रंथात गांड या आदिवासी जमातीविषयी सविस्तर विश्लेषण केलेले आहे.

संदर्भ ग्रंथ

१. उपाध्याय अशोक, “Peasqntisation of Aduvasis in Thane District 1818-1947” Ph.D. Thesis, पुणे विद्यापीठ, पुणे, १९८२.

२. एस. जी. देवगांवकर, “महाराष्ट्रातील निवडक जाती जमाती” साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००९.

३. एस. जी. देवगांवकर, “द माडिया ऑफ भामरागड” १९८२ Inter India Publicaation New Delhi, 1982.

४. एस.जी. देवगांवकर, “आदिवासी विश्व” आनंद प्रकाशन, नागपूर, २००१,

५. एस.जी. देवगांवकर, “आदिवासी विकास प्रशासन” श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०११.

६. कुसुम नारगोळकर व वसंत नारगोळकर, “जंगलाचे राजे” मौनी विद्यापीठ, गारगोटी, १९५५.

७. के. जे. सावे, “The Warlis” padma publication, Bombay, 1945.

८. कोकाटे चंद्रकांत, “हिंगोली जिल्हयातील आदिवासी समाजाचे आर्थिक आणि सामाजिक अध्ययन" Ph.D. Thesis, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. २००८.

९. गायकवाड एम. एस., “आदिवासी संशोधन पत्रिका” आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे, XXV NO. L- 21S 2002.

१०. गोविंद गारे, “सहयाद्रीतील आदिवासी महादेव कोळी” सहाध्यायन, मुंबई, १९७४.

११. गोविंद गारे, “ट्राईब्ज इन अॅन अर्बन सेटिंग” सारस्वत प्रकाशन, पुणे, १९७५.

१२. गोविंद गारे, “भारतीय आदिवासी समाज आणि संस्कृती” आदिम प्रकाशन, पुणे, १९७६.

१३. छाया जाधव, “एकात्मिक आदिवासी विकास कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांचा सन १९९०-९५ या कालखंडातील अभ्यास व मूल्यमापन.” Ph.D. Thesis, पुणे विद्यापीठ पुणे, मार्च २००५.

१४. जयवंत इंगळे, “महाराष्ट्र राज्यातील ठाणे जिल्हयातील आदिवासीची आर्थिक आणि सामाजिक स्थिती” Ph.D. Thesis पुणे विद्यापीठ पुणे, ऑगस्ट २००८.

१५. त्रिकोण पी. आर., “ठाकर जमातीची सामाजिक व आर्थिक स्थिती एक आढावा”, आदिवासी संशोधन पत्रिका, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था महाराष्ट्र राज्य पुणे, १९९५.

१६. देशमुख भाऊसाहेब यशवंतराव, “आदिवासी विकास योजनांचा अकोले तालुक्यातील आदिवासींच्या शेती, शेतकरी व संलग्न व्यवसायांवर झालेला परिणाम एक चिकित्सक अभ्यास” Ph.D Thesis. पुणे विद्यापीठ, पुणे, २००२.

१७. धारणे उध्दव वासुदेव, “भिल्ल आदिवासी जमातीचे सामाजिक आणि आर्थिक पाहणी, नवापूर तालुका जिल्हा नंदुरबार येथील पथदर्शक अहवाल”, MSW पदवीसाठी अहमदनगर येथे शोध निबंध सादर सन २००० - ०१.

१८. पोळ अमृत वासुदेव, “Economic Change among tribles” Ph.D. Thesis, मुंबई विद्यापीठ, मुंबई, १९८५.

१९. बी. एम. कांबळे, “Effectinehess of Developmental Programmes for scheduled castes & scheduled Tribals in Maharashtra" Ph.D Thesis, पुणे विद्यापीठ, पुणे, १९९५.

२०. भामरे बी. पी., “शहादा तालुक्यातील आदिवासी शेतमजुरांच्या आर्थिक समस्यांचे अध्ययन सन १९९१,” एम.फील. पदवीसाठी प्रबंध सादर सन १९९३, अमरावती विद्यापीठ.

२१. मनोज आवाळे, "शेतकऱ्यांसाठी अर्थसहाय्याच्या व अन्य विविध योजना” सन चौधरी लॉ. पब्लिशर्स, जळगाव, पुणे, २०१३.

२२. मनोज पाटील, “नागरीकांसाठी केंद्र व राज्य शासनाच्या विकास योजना”, चौधरी लॉ. पब्लिशर्स, जळगाव, पुणे, २०१३.

२३. मांडवकर भाऊ, “कोलाम” सेवा प्रकाशन, अमरावती, १९६६.

२४. रसेल हिरालाल, “द ट्राईब्ज अॅण्ड द कॉस्टस् ऑफ द सेन्ट्रल प्रॉव्हिन्सेस् ऑफ़ इंडिया” Vo. I.II.III. Cosmo Publication, New Delhi, 1975.

२५. वि. श्री. कुलकर्णी, “भारतीय आदिवासी वंश” महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, पुणे, २००२.

२६. समल जगबंधु, “Some Aspects of the tribal Economy a case study of korput distit” Ph.D. Thesis, पुणे विद्यापीठ, पुणे, १९७२.

२७. सुधीर जयराम बिरज, "शेती बिनशेती जमीन" चौधरी लॉ. पब्लिशर्स, जळगाव, पुणे, २०१३.

संशोधक — **मार्गदर्शक**

खंडेराव बाळासाहेब महाले

डॉ. मारोती धोंडीबा कछवे
प्रोफेसर व वाणिज्य विभाग प्रमुख
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय,
सोनपेठ, जि. परभणी